


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक १५५ ●गुरूवार, दि. ०४ सप्टेंबर २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955






# फडणवीस सरकारचा धडाका!

## मंत्रिमंडळ बैठकीत घेतले 14 मोठे निर्णय

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आज मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. या मंत्रिमंडळ बैठकीत १४ मोठे निर्णय घेण्यात आले आहेत. यामध्ये केंद्रातील राखेचे धोरण निश्चितीसह ठाणे वर्तुळाकार मेट्रो, पुण्यातील मेट्रो मार्गिका - २, मार्गिका - ४ तसेच नागपूर मेट्रोच्या टप्पा दोनच्या कर्जांस मान्यता देण्यात आली आहे. जाणून घ्या सर्व निर्णय..

● सामाजिक न्याय विभाग: संजय गांधी निराधार, श्रावणबाळ योजनेतील दिव्यांगांच्या अर्थसहाय्यात १ हजार रुपयांची वाढ लाभार्थ्यांना दरमहा दीड हजार ऐवजी आता अडीच हजार रुपये मिळणार

● ऊर्जा विभाग: महानिर्मिती कंपनीच्या औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रातील राखेच्या वापराबाबतचे धोरण निश्चित

● कामगार विभाग:महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन) अधिनियम, २०१७ मध्ये सुधारणा, कारखाने अधिनियम, १९४८ मध्ये सुधारणा

● आदिवासी विकास विभाग: अनुसूचित जमातीतील नववी, दहावीच्या विद्यार्थ्यांना सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजनेऐवजी केंद्र सरकारची पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना लागू करणार

● नगर विकास विभाग: मुंबईतील आणिक डेपो- वडाळा ते गेटवे ऑफ इंडिया या मेट्रो मार्गिका- ११ प्रकल्पास मान्यता. २३ हजार ४८७ कोटी ५१ लाख रुपयांची तरतूद

● नगर विकास विभाग: ठाणे वर्तुळाकार मेट्रो, पुण्यातील मेट्रो मार्गिका - २, मार्गिका - ४ तसेच नागपूर मेट्रोच्या टप्पा दोनच्या कर्जांस मान्यता ठाणे अंतर्गत वर्तुळाकार मेट्रो प्रकल्प, पिंपरी-चिंचवड ते निगडी मेट्रो रेल्वे कॉरीडॉर, स्वारगेट ते कात्रज मेट्रो रेल्वे कॉरीडॉर, वनाज ते रामवाडी (मार्गिका क्र. २) च्या विस्तारीत मार्गिका वनाज ते चांदणी चौक व राम वाडी ते वाघोली (विठ्ठलवाडी), पुणे मेट्रो मार्ग-४ (खडकवासला स्वारगेट हडपसर-खराडी) आणि नळ स्टॉप वारजे-माणिकबाग (उपमार्गिका) व नागपूर मेट्रो रेल्वे टप्पा-२ या मेट्रो रेल्वे प्रकल्पांसाठी घेण्यात येणाऱ्या बाह्यसहाय्यित कर्जाचे आकस्मिक दायित्व स्वीकारण्यास, प्रकल्पांचे करारनामा, कर्ज करारनामा आणि दुय्यम वित्तीय करारनामे करण्यास मान्यता.

● नगर विकास विभाग: पुणे मेट्रोवरील बालाजीनगर, बिबवेवाडी या दोन नवीन स्थानकांना मंजूरी. स्वारगेट ते कात्रज मेट्रो मार्गावर बालाजीनगर व बिबवेवाडी ही दोन नवीन मेट्रो स्थानके उभारण्यास आणि कात्रज मेट्रो स्थानकाचे दक्षिणेकडे सुमारे ४२१ मीटरने स्थलांतरण करण्यास व यासाठीच्या ६८३ कोटी ११ लाख रुपयांच्या तरतुदीस मान्यता.

● नगर विकास विभाग: मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा-३ व ३अ प्रकल्पातील ▶▶ उर्वरित पान २ वर

# किडे-मकोड्यांचं ऐकू नका, राईट काम होणार

## मराठा जीआर खोटा म्हणणाऱ्यांना मनोज जरांगेंचं सडेतोड उत्तर

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**



मराठा समाजाला आरक्षण मिळावे, या मागणीसाठी मुंबईत उपोषणाला बसलेले मनोज जरांगे पाटील यांना मोठा दिलासा मिळाला आहे. राज्य सरकारने अखेर हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा निर्णय घेतला असून त्याबाबतचा जीआर काल जारी करण्यात आला. हा जीआर मिळाल्यानंतर जरांगे पाटील यांनी आपले उपोषण मागे घेतल्याची घोषणा केली. हैद्राबाद गॅझेटच्या नोंदी लक्षात घेऊन मराठा समाज ओबीसीत जाणार आहेत. सरकारने काढलेल्या जीआर मुळे सर्व मराठे ओबीसीत जाणार म्हणजे जाणार, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. काही लोकांचे ऐकून गैरसमज करुन घेऊ नका असं सांगत त्यांनी अफवांकडे दुर्लक्ष करण्याचा सल्ला दिला.

**● कधीही आपण आपला संयम ढळू द्यायचा नाही**

जरांगे बोलताना म्हणाले, मराठ्यांनी जीवाची बाजी लावून अखेर ही लढाई जिंकली. खूप प्रतीक्षा ▶▶ उर्वरित पान २ वर

# रत्नागिरीत सापडला सीरियल किलर! घाटात सापडलेल्या मृतदेहाने केले धक्कादायक खुलासे; कोण आहे हा दुर्वास पाटील?

**रत्नागिरी । प्रतिनिधी**



कोकणात रत्नागिरी शहर परिसरात युवतीच्या खूनप्रकरणात अटक केलेल्या दुर्वास पाटील याने आणखी दोन खून केल्याचे पोलीस तपासात समोर आले असून त्यामुळे अवघे कोकण हादरले आहे. हे सगळे खून दुर्वास पाटील याच्या वडिलांच्या नावे असलेला सायली बारजवळच संबंधित असल्याचेही स्पष्ट झाल आहे. सिरीयल किलर ठरलेला दुर्वास व त्याचे साथीदार सध्या पोलीस कोठडीत आहेत.

एका खुनाचा तपास सुरू असताना दुर्वास पाटील या नराधमाने एक, दोन नव्हे तर तब्बल तीन खून केल्याचे समोर आले आहे. पहिला खून सीताराम वीर (५०, वाटद-खंडाळा), दुसरा खून राकेश जंगम (२८, वाटद,खंडाळा), तर तिसरा खून भक्ती मयेकर हिचा केल्याचे चौकशीत निष्पन्न झाले आहे. दुर्वास पाटील याला अटक केल्यानंतर तो सराईत गुन्हेगारासारखा वाटत होता. त्याचवेळेला पोलिसांचा संशय बळावला व वाटद खंडाळा येथील आणखी एक जण बेपत्ता

▶▶ उर्वरित पान २ वर

# मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनी बीडमध्ये धावणार रेल्वे

## बीड ते परळी रेल्वे मार्ग कामाला गती देऊन रेल्वे मार्ग पूर्ण करा : उपमुख्यमंत्री अजित पवार

**मुंबई । प्रतिनिधी**



बीड शहर लवकरच रेल्वेच्या नकाशावर येणार असून मराठवाडा मुक्ती संग्राम दिनी बीड ते अहिल्यानगर रेल्वे गाडी सुरू करण्यात येणार आहे. यामुळे अनेक वर्षापासूनचे बीड वासियांचे रेल्वेसेवेचे स्वप्न पूर्ण होणार आहे. येत्या १७ सप्टेंबर रोजी बीड ते अहिल्यानगर रेल्वे गाडीला हिरवा झेंडा दाखवून शुभारंभ करण्याचा निर्णय आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगह येथे झालेल्या बैठकीत घेण्यात आला. उर्वरित बीड ते परळी वैजनाथ या रेल्वे मार्गातील अडथळे दूर करून गतीने काम पूर्ण करण्याच्या सूचनाही उपमुख्यमंत्री श्री पवार यांनी दिल्या.

बैठकीला महापारेषण कंपनीचे महाव्यवस्थापक संजीव कुमार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव श्री दशपुते, वित्त विभागाच्या सचिव (वित्तीय सुधारणा) शैला ए,

▶▶ उर्वरित पान २ वर

# मराठा आरक्षणाच्या जीआरबाबत संभ्रम, आम्ही कोर्टात जाऊ;

## सरकारच्या निर्णयाविरोधात मंत्री छगन भुजबळांची भूमिका

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्य सरकारने मराठा आरक्षणावर काढलेल्या जीआरवर त्यांचेच मंत्री छगन भुजबळांनी नाराजी व्यक्त केली आहे. ओबीसी कार्यकर्त्यांनी राज्यभर जिल्हाधिकारी, तहसीलदार यांना निवेदन द्यावं आणि ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लावू नये अशी मागणी करावी असं आवाहन छगन भुजबळांनी केलं. सरकारच्या या जीआरवर आम्हाला संभ्रम आहे, ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागत असेल तर त्या विरोधात आम्ही न्यायालयात जाऊ असंही छगन भुजबळ म्हणाले.

मनोज जरांगे यांच्या आंदोलनानंतर राज्य सरकारने मराठा आरक्षणाचा नवा जीआर काढला. त्यामध्ये हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. या गोष्टीला ओबीसी नेत्यांनी विरोध दर्शवला. राज्य सरकारच्या या निर्णयाविरोधात मंत्री छगन भुजबळांनीही नाराजी व्यक्त केली आणि मंत्रिमंडळाच्या बैठकीवरही बहिष्कार टाकल्याचं




# परळीत १२ लाखांचा गांजा जप्त

**परळी । प्रतिनिधी**



शहरातील इराणी वस्ती येथे छापा टाकून पोलिसांनी ५३ किलो गांजा आणि इतर साहित्य असा एकूण १२ लाख २३ हजार ६८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे व संभाजीनगर पोलिसांनी केली असून या कारवाईमुळे पोलिसांचे आभार मानले जात आहे. सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे व संभाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस ▶▶ उर्वरित पान २ वर

# महाराष्ट्र शासनाचे 9 वर्षे मुदतीचे 1,000 कोटी रुपयांचे रोखे विक्रीस

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या ९ वर्षे मुदतीच्या १,००० कोटींच्या रोख्यांची विक्री शासनाच्या सुधारित अधिसूचनेतील अटी आणि शर्तींच्या अधीन राहून करण्यात येईल. या कर्जाद्वारे

▶▶ उर्वरित पान २ वर

# 'पीएसआय' पदांसाठी विभागीय परीक्षा पुन्हा सुरु

**मुंबई । प्रतिनिधी**

पोलिस उपनिरीक्षक (पीएसआय) पदांसाठी खातेअंतर्गत विभागीय परीक्षा पुन्हा सुरू करण्याची सूचना गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी एप्रिल २०२५ मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्राद्वारे मांडली होती.

पूर्वी किमान पाच वर्षांची सेवा पूर्ण केलेल्या पोलिस अंमलदारांना पोलिस उपनिरीक्षक पदासाठी २५ टक्के आरक्षणाच्या अंतर्गत विभागीय परीक्षा देता येत होती. या माध्यमातून अनेक पोलिस कर्मचाऱ्यांना अधिकारी होण्याची सुवर्णसंधी मिळत होती. मात्र फेब्रुवारी २०२२ च्या शासन

▶▶ उर्वरित पान २ वर




# वैद्यकीनीत योग्य नियोजन न करता रस्त्या केल्याने मस्के कुटुंबाच्या घरात पाणी



**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील वैद्यकीनी गावामध्ये योग्य नियोजन न करता रस्ता केल्यामुळे रस्त्यावरचे पाणी थेट घरामध्ये घुसून मस्के कुटुंबाचे मोठे नुकसान झाले आहे. पावसाचे पाणी घरात शिरल्याने घरगुती साहित्य, धान्यसाठा तसेच अन्य वस्तूंचे नुकसान झाले असून कुटुंबावर मोठे संकट ओढावले आहे.रस्ता करताना बांधकामाचे योग्य नियोजन न केल्यामुळे या घटनेला ग्राम सेवक जबाबदार असल्याचा आरोप मस्के कुटुंबाने केला आहे. या प्रकरणाची तातडीने चौकशी करून दोषी ग्राम सेवकावर कारवाई करण्यात यावी, अशी जोरदार मागणी दिपक मस्के यांनी केली आहे. नुकसानीची भरपाई तसेच भविष्यात अशा प्रकारचा अनर्थ टाळण्यासाठी पावसाच्या पाण्याचा निचरा करण्याची योग्य व्यवस्था करावी, अशी मागणीही मस्के यांनी प्रशासनाकडे केली आहे.



# ग्रामीण भागातील रस्त्यांचे सीमांकन, अतिक्रमण निर्मूलन व मोफत वाळू धोरण: विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांचे अधिकाऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन

महाराष्ट्र शासनाने ग्रामीण भागातील रस्ते , हद्दीचे रस्ते , ग्रामिण गाडीरस्ते , पायमार्ग , शेतावर जाण्याचे पायमार्ग व गाडीरस्ते तसेच पंचायत क्षेत्र / पंचायत रस्त्यांचे अतिक्रमण हटवून त्यांचे सीमांकन निश्चित करण्यासाठी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे . ग्रामीण रस्त्यांचे अचूक मोजमाप करून त्यांची नोंदणी , सीमांकन , क्रमांक व प्रकार निश्चित करून शासनाच्या नोंदीत दाखल करण्याचे आदेश महसूल व वन विभागाने जाहीर केले आहेत .

गाव नकाश्यावर उपलब्ध असलेले रस्ते खालीलप्रमाणे प्रकारात विभागले गेले आहेत – १) ग्रामीण रस्ते – एका गावातून दुसऱ्या गावात जाणारे . २) हद्दीचे रस्ते – गाव ते गाव जोडणारे . ३) ग्रामीण गाडीरस्ते (पोटखराब ) – गाडीने जाण्यास योग्य . ४) पायमार्ग ( पोटखराब ) – गावातून दुसऱ्या गावात जाण्यासाठी . ५) शेतावर जाण्याचे पायमार्ग व गाडीरस्ते – शेतकरी शेतीकामासाठी वापरत असलेले मार्ग . हे सर्व रस्ते महाराष्ट्र जमीन महसूल संहिता , १९६६ च्या तरतुदीनुसार



शासनाचे मालकीचे मानले जातात . ग्राम नकाशे स्कॅनिंग करून डिजिटलायझेशन , भूमि संदर्भांकन ( जिओ रेफरन्सिंग ) याद्वारे रस्त्यांचे अचूक सीमांकन केले जाणार आहे . रस्त्यांची रुंदी , लांबी व स्थान निश्चित करून त्यावर सीमा खुणा उभारण्यात येतील . जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रक्रिया राबवण्यात येईल .अतिक्रमण असलेल्या रस्त्यांची प्राथमिक यादी गावसभेत मांडली जाईल . तहसीलदार , ग्रामसेवक , पोलिस पाटील व ग्रामस्थांच्या सहभागाने प्रत्यक्ष पाहणी करून अहवाल तयार केला जाईल . ग्रामनकाशावर नसलेले पण प्रत्यक्ष वापरात असलेले मार्ग सुद्धा तपासून शासन नोंदीत दाखल करण्यात येतील . रस्ता अडविणारे अतिक्रमणदारांना नोटीस देऊन आवश्यक ती कारवाई केली जाईल . या कार्यवाहीसाठी जिल्हास्तरावर व तालुकास्तरावर समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत . जिल्हास्तरीय समिती – जिल्हाधिकारी ( अध्यक्ष ) , मुख्य कार्यकारी अधिकारी , पोलीस अधीक्षक , जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख , निवासी उपजिल्हाधिकारी / उप जिल्हाधिकारी असतील तर तालुकास्तरीय समितीत उपविभागीय अधिकारी (अध्यक्ष) , गटविकास अधिकारी , तहसीलदार ( सदस्य सचिव ) , तालुका भूमी अभिलेख अधिकारी व पोलिस निरीक्षक असतील .

प्रत्येक रस्त्यास स्वतंत्र क्रमांक दिला जाणार असून , तो जिल्हा , तालुका , गाव व रस्ता क्रमांक अशा पद्धतीने दर्शविला जाईल . तसेच रस्त्यांच्या प्रकारानुसार विशेष संकेत चिन्ह (ऐ ते ई) देण्यात येईल . ऐ – डबल लाईन , बी – डबल डॉटेड लाईन , सी – सिंगल डॉटेड लाईन , डी – नकाशावर नमूद नसलेले पण वापरात असलेले रस्ते , ई – शिवरस्ते / पानंद रस्ते . या निर्णयामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी सुलभ मार्ग उपलब्ध होणार असून रस्त्यांवरील अतिक्रमण दूर होणार आहे . शासन नोंदीत रस्त्यांचे अचूक सीमांकन झाल्याने वाद , तंटे आणि कायदेशीर अडचणी टळतील . तसेच ग्रामपंचायतींना रस्ते दुरुस्ती , देखभाल व विकासकामांसाठी निश्चित मार्गदर्शक सूचना मिळतील .

बुधवार दिनांक ३ सप्टेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी वरील विषयाच्या अनुषंगाने शासनाचे मोफत वाळू धोरण , कृत्रिम वाळू निर्मिती प्लांट जास्तीत जास्त सुरू करणे , त्या अनुषंगाने वेळोवेळी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केलेल्या सूचनांच्या आधारे छत्रपती संभाजीनगर विभागातील सर्व जिल्हाधिकारी , निवासी उपजिल्हाधिकारी , सर्व उपविभागीय अधिकारी , सर्व अधीक्षक भूमी अभिलेख , तहसीलदार , सर्व मंडळाधिकारी , ग्राम महसूल अधिकारी यांची दूरभाष्य प्रणाली द्वारे बैठक घेतली . यात उपरोक्त शासन निर्णयाबद्दल सविस्तर माहिती देण्यात आली . घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळू उपलब्ध करून देणेबाबत कशाप्रकारे नियोजन करावे याबाबत मार्गदर्शन केले . या वेळी विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी स्पष्ट केले की ग्रामीण भागातील रस्त्यांचे सीमांकन व अतिक्रमण निर्मूलनासोबतच मोफत वाळू धोरण प्रभावीपणे अंमलात आणणे ही प्रत्येक जिल्हाधिकाऱ्याची प्राथमिक जबाबदारी आहे . तसेच नागरिकांना शासनाच्या योजनांचा लाभ वेळेवर मिळावा यासाठी प्रशासनाने तत्परतेने काम करावे , असे आवाहन त्यांनी केले . यावेळी उपायुक्त के . आर . परदेशी , तहसीलदार अरुण पावडे हे विभागीय आयुक्त कार्यालयात तर प्रत्येक जिल्हास्तरावर तालुकास्तरावर विविध अधिकारी व कर्मचारी या बैठकीस उपस्थित होते. बीड जिल्ह्यात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , अंबाजोगाईच्या अपर जिल्हाधिकारी अश्विनी जिरंगे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात अनेक उपक्रम राबविण्यात येत आहेत . कृत्रिम वाळूसाठी प्रोत्साहन देण्यात येत आहे . बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके अविरतपणे शेतकऱ्यांसाठी राबत आहेत . ऊन , वारा , पाऊस यांची तमा न बाळगता ते रस्ते खुले करून देण्यासाठी पुढाकार घेतात . शासनाच्या वरील निर्णयामुळे रस्त्यांना क्रमांक मिळाले आणि पक्के रस्ते झाल्यास , अतिक्रमण मुक्त झाल्यास सुजलाम सुफलाम भारत घडण्यास अडचण येणार नाही , हे मात्र निश्चित !

◆ पान ४ वरून पुढे...

## फडणवीस सरकारचा...

लोकल (उपनगरीय रेल्वे) गाड्यांच्या खरेदीसाठी कर्जास मान्यता, बाह्य सहाय्यित कर्ज घेण्याऐवजी पूर्णतः रेल्वे व राज्य शासनाच्या निधीतून सहाय्य देण्यास, तसेच त्यामध्ये राज्य शासनाच्या वतीने ५०% आर्थिक सहभाग देण्यास मान्यता.

नगर विकास विभाग: मुंबई नागरी परिवहन प्रकल्प या प्रकल्पातील राज्य शासनाच्या ५० टक्के आर्थिक सहभागास मान्यता

नगर विकास विभाग: पुणे ते लोणावळा लोकल (उपनगरीय रेल्वे) च्या तिसऱ्या व चौथ्या मार्गिका प्रकल्प खर्चाची तरतूद करणार. मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाच्या धर्तीवर आर्थिक भार उचलणार

नगर विकास विभाग: ठाणे ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ दरम्यान उन्नत मार्ग – हा प्रकल्प सिडको महामंडळाच्या माध्यमातून सार्वजनिक–खाजगी–भागीदारी अंतर्गत BOT तत्त्वावर राबविण्यात येणार नगर विकास विभाग: नविन नागपूर अंतर्गत आंतरराष्ट्रीय व्यापार व वित्तीय केंद्र विकसित करणार – नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण मौजा गोधणी व मौजा लाडगांव , तालुका हिंगणा जि. नागपूर येथील एकूण अंदाजे क्षेत्र ६९२.०६ हे. आर. जागा संपादित करून सार्वजनिक हितार्थ नविन नागपूर अंतर्गत International Business and Finance Centre (IBFC) विकसीत करण्याचा महत्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यास तत्वत मान्यता.

नगर विकास विभाग: नागपूर शहराभोवती बाहय वळण रस्ता व त्यालगत चार वाहतूक बेटांची निर्मिती– नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत नागपूर शहराभोवती बाहय वळण रस्ता व त्यालगत ४ वाहतूक बेट विकसित करणार.

विधि व न्याय विभाग: मुंबईतील वांद्रे (पूर्व) येथील उच्च न्यायालयाच्या नवीन संकुल बांधकामाच्या खर्चास मान्यता प्रकल्पासाठी ३ हजार ७५० कोटी रुपयांच्या तरतुदीस मान्यता

## किडे-मकोड्यांचं...

पाहिली पण ही लढाई लढून मराठ्यांनी शेवटी यश आपल्या पदरात पाडून घेतलं. आतापर्यंत मिळालेल्या यशाचं सर्व क्रेडिट मी मराठा समाजाला देतो. त्यांनीच हे सगळे यश मिळवले आहे, मी नाममात्र आहे. पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा सगळे मराठा आरक्षणात जाणार याच्यात तीळ मात्र शंका नाही आणि कोणी शंका देखील ठेवायची देखील नाही, ज्यांच्या नोंदी नाहीत त्यासाठी गॅझेटियर करायचा आहे. त्याचा जीआर निघणं खूप अवघड होतं. जो १८८१ पासून काढला नाही, एक साधी ओळ मराठ्यांच्या हिताची सरकारने लिहिली नव्हती, ७५ ते ७६ वर्ष झाले, मराठ्यांचं मराठवाड्यातील हक्काचा गॅझेटियर असून साधी ओळ देखील मराठ्यांच्या हिताची एक ओळ सरकारने दिली नव्हती, फक्त शांतता आणि संयम ठेवा आणि शांत डोक्याने विचार करा, एखादा विदूषक आणि अविचारी माणसाच्या वरती विश्वास ठेवून कधीही आपण आपला संयम ढळू द्यायचा नाही आणि विश्वास ढळू द्यायचा नाही, असंही जरांगेंनी म्हटलं आहे.

मराठा समाजाचं मी का वाटोळं करेल ? पुढे जरांगे म्हणाले, निर्णय घेताना कायम आम्ही दोघेजण निर्णय घेतो. मी कधी निर्णय घेताना एकटा घेत नाही, सात करोड गोरगरीब जनता आणि मी मिळून निर्णय घेतो, सरकारच्या बाजूने बोलून निगेटिव्ह पसरवायचं चाललं आहे,

◆ पान ४ वरून पुढे...

ज्याच्या नोंदी नाही त्याच्यासाठी तिघा जणांची समिती केली आहे, गाव स्तरावर आणि तालुका स्तरावर हैदराबाद मध्ये असणाऱ्या नोंदी म्हणजे मराठवाड्याचा मराठा हाच कुणबी आहे, याच्यासाठी तिघा जणांची समिती केली आहे. ज्यांच्याकडे जमीन नाही त्यांनी कोणाची जमीन केली असेल तर हमीपत्र देऊन कुणबी प्रमाणपत्र निघणार ही प्रक्रिया लवकर सुरू होणार आहे. हे लक्षात ठेवा. मी तुमचं का वाटोळ करेन, मराठा समाजाचं मी का वाटोळं करेल ? दोन–चार जण बोलले असं पत्रकार बांधवांचे म्हणणं आहे, समाज आनंदी आहे. आम्हाला कोणाचं देणंघेणं नाही, या पलीकडे सांगतो जर गैरसमज वाटत असेल तिथे आलेल्या मंत्रिमंडळाला स्पष्ट सांगितलं आहे, मराठा समाजाच्या लेकरा बाळाचं आणि समाजाच्या लेकरांचं कल्याण करतोय, असंही जरांगेंनी म्हटलं आहे.

किडे मकोड्यांचं ऐकू नका, राईट काम होणार– किडे मकोड्यांचं ऐकू नका, राईट काम होणार आहे, मराठ्यांनी डोकं चालवायचं, काही जण शत्रुच्या टोळीत राहीलेले आहेत, काहींना कोलत चला, त्यांच्याकडे लक्ष देऊ नका, असंही त्यांनी म्हटलं आहे. मराठे आरक्षणात गेले हे सिध्द झालं आहे. हा जीआर खोटा असता तर उडाला असता, काही जण म्हणतात जीआर खोटा काही नाही, निर्भीड राहायचं, सरसकट झालं, असंही जरांगे यांनी म्हटलं आहे.

## रत्नागिरीत सापडला...

असल्याची तक्रार दाखल होती. त्याचा तपास सुरू असतानाच राकेश जंगम या बेपत्ता असलेल्या तरुणाचाही खून दुर्वास यानेच केल्याच्या समोर आले आहे. पोलिसांनी तपासात पोलीसी खाक्या दाखवताच त्याने या सगळ्या खून प्रकरणांची माहिती देऊन पोलीस तपासात कबुली दिली आहे. मारहाणीतून झाला पहिला खून– दुर्वास पाटील यांनी पहिला खून केला तो सीताराम वीर (५०, वाटद–खंडाळा) यांचा. सीताराम वीर हे दुर्वास पाटील याच्या सायली बारमध्ये कामाला होते. अमित सिताराम वीर, वय ३२ वर्षे याने या विरोधात तक्रार दाखल केली आहे. मैत्रीण भक्ती मयेकर हिला अमित वीर यांचे वडील सिताराम वीर हे फोनवर बोलून त्रास देतात या रागाने दूर्वासने अन्य दोघांच्या संगनमताने हाताने व काठीने मारहाण केली व रिक्षा करून त्यांना चक्कर आली आहे असे सांगून घरी पाठवलं, त्यातच त्यांचा मृत्यू झाला. या खून प्रकरणात दुर्वास दर्शन पाटील, विश्वास विजय पवार यांच्याबरोबरच रत्नागिरी कोकणनगर परिसरात राहणाऱ्या राकेश अशोक जंगम हा तिसरा आरोपी होता. पण नंतर राकेश जंगम याचाही खून दुर्वास पाटील याने केल्याचे उघड झाले आहे.

पहिल्या खुनातील साक्षीदारालाही संपवले– दुर्वासा याने दुसरा खून केला तो राकेश जंगम (२८, वाटद,खंडाळा) याचा. राकेश याला सीताराम वीर यांच्या खुनाची माहिती होती. राकेशने घरी आईला सांगितले होते. ६ जून २०२४ रोजी तो कपड्याची बॅग आणायला जातो, असे सांगून घरातून गेला होता. पण तो कधी परतलाच नाही. आईने तो बेपत्ता असल्याची फिर्याद जयगड पोलिस ठाण्यात दिली होती. राकेश याला आपण कोल्हापूरला जातो असा खोटा बहाणा करून दुर्वास पाटील आणि नीलेश भिंगार्डे यांनी आंबाघाटात खून करून त्याचा मृतदेह टाकून दिला. एक वर्षभर बेपत्ता राहिल्याने गुन्हेगार दुर्वास निर्धास्त झाला होता.

भक्ती हिचा तिसरा खून– तिसरा खून केला तो भक्ती मयेकर ( २६, मिरजोळे) हिचा. यानंतर दुर्वासच्या डोक्यात भक्ती मयेकरला मारण्याचा

◆ पान ४ वरून पुढे...

कट सायली बारमध्येच रचला. आंबा घाट हे निर्जन स्थळ असल्याने या ठिकाणी मृतदेह टाकल्यास सापडणार नाही अशी त्याला खात्री होती. त्याप्रमाणे भक्तीचा ही बारच्या वरती असलेल्या रूममध्ये केबलने गळा आवळून खून केला. व पुरावा नष्ट करण्याचे हेतूने मृतदेह आंबाघाटात रात्रीच्या वेळी फेकून दिला. तब्बल दहा दिवसानंतर बेपत्ता असलेल्या भक्तीचा खून झाल्याचे उघड झाल.

## मराठवाडा मुक्तिसंग्राम...

उपमुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ राजेश देशमुख, सहसचिव (परिवहन) राजेंद्र होळकर, रेल्वेचे मुख्य विद्युत अभियंता विनीत कुमार, रेल्वेच्या पुणे विभागाचे अप्पर विभागीय व्यवस्थापक पद्मसिंह जाधव, मुख्य प्रवासी वाहतूक व्यवस्थापक मिलिंद हिरवे, मुख्य जनसंपर्क अधिकारी स्वप्नील नीला, मुख्य अभियंता प्रशांत भेगडे आदी उपस्थित होते. तसेच दूरदृश्य प्रणालीद्वारे छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, बीड जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी बैठकीत सहभाग घेतला. उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, बीड ते परळी वैजनाथ रेल्वे मार्गाच्या भूसंपादनाचे प्रलंबित प्रकरणे बीड जिल्हा प्रशासनाने तातडीने निकाली काढून आवश्यक जमीन उपलब्ध करून द्यावी. या रेल्वे मार्गासाठी राज्य शासनाच्या हिस्स्याची रक्कम तातडीने अदा करण्यात यावी. अर्थसंकल्पात मंजूर १५० कोटी रुपये देण्यात यावे. उर्वरित १५० कोटी रुपयांची तरतूद करावी. रेल्वेने आतापर्यंत दिलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करावी. फलटण ते लोणंद या रेल्वे मार्गाचे काम करावे. बारामती रेल्वे स्थानकाच्या कामाला रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी भेटी द्याव्या. तसेच कामाला गती देऊन पुढील काळात सुसज्ज रेल्वे स्थानक प्रवाशांच्या सेवेसाठी उपलब्ध करून द्यावे, असे निर्देशही उपमुख्यमंत्री श्री पवार यांनी दिले.

## मराठा आरक्षणाच्या...

दिसून आलं. चार दिवसात न्यायालयात जाऊ– छगन भुजबळ म्हणाले की, या जीआर बाबत अद्याप संभ्रम आहे. याबाबत आमच्या नेत्यांनी आणि अभ्यासकांनी, राज्यात वेगवेगळ्या ठिकाणी निवेदनं दिली आहेत. काही ठिकाणी ओबीसी कार्यकर्त्यांनी उपोषण सुरू केले आहेत. अनेक कायदेतज्ज्ञ, वकील आणि इतरांशी चर्चा करून याची माहिती घेत आहोत. जर आवश्यक असेल तर चर्चा करून येत्या चार दिवसात त्या विरोधात न्यायालयात जाऊ. या जीआरच्या विरोधात न्यायालयात जाण्याची आमची तयारी असून त्यासाठी ज्या कागदपत्रांची जुळवाजुळवी करावी लागेल ती आम्ही करू असं छगन भुजबळ म्हणाले. राज्यातील कार्यकर्त्यांनी त्या–त्या ठिकाणच्या जिल्हाधिकारी आणि तहसीलदारांना ओबीसींच्या हक्कांवर गदा येऊ देऊ नये अशी निवेदनं द्यावीत. आपले म्हणणे शांतपणे मांडावं. या व्यतिरिक्त जर कुणी उपोषण करत असेल किंवा इतर काही मार्ग पत्करत असेल तर त्या गोष्टी तूर्तास थांबवाव्यात असं भुजबळ म्हणाले. भुजबळांची बैठकीला दांडी– मुंबईतल्या मराठा आंदोलनामुळे उडालेली धूळ खाली बसत नाही, तोच आता राज्यभरातील ओबीसी समाज आक्रमक झाल्याचं दिसतंय. यातील सर्वांत मोठे हिरो ठरले ते छगन भुजबळ. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीसाठी ते सह्याद्री अतिथीगृहावर पोहोचले खरे, मात्र बैठकीत काही सहभागी झाले नाहीत. राष्ट्रवादीच्या मंत्रिमंडळपूर्व बैठकीला हजेरी लावून ते निघून गेले. त्यांना मंत्रिमंडळ बैठकीला दांडी मारण्याचं नेमकं कारण

◆ पान ४ वरून पुढे...

विचारण्याचा प्रयत्न माध्यमांनी केला खरा, मात्र भुजबळ काहीही न बोलता निघून गेले. त्यामुळे मग ते नाराज असल्याची आणखीनच चर्चा रंगली. तिथून ते थेट भुजबळ नॉलेज सिटीमध्ये पोहोचले आणि त्या ठिकाणी प्रकाश शेंडगेंसह अनेक ओबीसी नेत्यांसोबत त्यांनी चर्चा केली.

## परळीत १२...

निरीक्षक धनंजय ढोणे यांना गुप्त खबऱ्या कडून मिळालेल्या माहितीनुसार त्यांनी सहकायारसह इराणी वस्ती मध्ये एका घरावर छापा टाकून झडती घेतली असता यावेळी पोलिसांना छाप्यामध्ये एकूण ५३ किलो १३४ ग्रॅम गांजा किंमत अंदाजे १० लाख ६२ हजार ६८०, ३१ मोबाईल, इलेक्ट्रॉनिक वजनकाटे, पॅकिंग मटेरियल, लेडीज पर्स, डम, टब, डीव्हीआर सिस्टीम, रिक्षा इत्यादी एकूण १२ लाख २३ हजार ६८० रुपयांचा चा मुद्देमाल मिळून आला असून सर्व मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी आरोपी वसीम ऊर्फ शराबी अक्रम बेग व अक्रम रफीक बेग यांच्याविरुद्ध पोलीस ठाणे संभाजीनगर, परळी येथे गुरनं १८३/२०२५ एन.डी.पी.एस. क्ट १९८५ चे कलम ८ (क), २०, २२ अंतर्गत नोंद करण्यात आला आहे.

## महाराष्ट्र शासनाचे...

मिळालेल्या रकमेचा विनियोग शासनाच्या विकास कामासाठी अर्थपुरवठा करण्यासाठी केला जाईल, अशी माहिती वित्त विभागाच्या सचिव शैला ए. यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे. अस्पर्धात्मक लिलाव पद्धतीनुसार (सुधारित) एकूण अधिसूचित केलेल्या शासन कर्जरोखे रकमेच्या १० टक्के रक्कम पात्र वैयक्तिक व संस्थात्मक गुंतवणुकदारांना वाटप करण्यात येईल. मात्र एका गुंतवणुकदारास एकूण अधिसूचित रकमेच्या जास्तीतजास्त १ टक्का रकमेच्या मर्यादेपर्यंत वाटप करण्यात येईल. ९ सप्टेंबर , २०२५ रोजी भारतीय रिझर्व्ह बँकेतर्फे मुंबई येथील कार्यालयात लिलाव केला जाईल.

## 'पीएसआय' पदांसाठी....

निर्णयानुसार ही परीक्षा बंद करण्यात आली होती. ही परीक्षा पुन्हा सुरू करण्याच्या मागणीचा सातत्याने पाठपुरावा करीत राज्यमंत्री योगेश कदम यांनी मुख्यमंत्री यांच्याशी चर्चा केली. याबाबत अधिकृत निर्णय घेण्यात आला आहे. साधारणपणे पोलिस कॉन्स्टेबलना सेवाकालाच्या शेवटच्या टप्प्यात पदोन्नतीद्वारे पीएसआय पद मिळते. अशावेळी त्यांना पीएसआय म्हणून फारतर दोन–तीन वर्षेच काम करता येते. परंतु विभागीय परीक्षेतून पीएसआय झालेल्या अधिकाऱ्यांना कमी वयातच पदोन्नती मिळाल्याने त्यांना पुढील २० ते २५ वर्षे पीएसआय किंवा त्यापेक्षा वरिष्ठ पदांवर कार्य करण्याची संधी मिळू शकते. यामुळे नव्या उमेदीचे, तरुण पीएसआय जोश आणि ऊर्जा घेऊन कार्यरत होतील. या निर्णयामुळे राज्यातील मेहनती, अनुभवी तसेच तरुण पोलिस अंमलदारांसाठी पीएसआय पदाचा मार्ग पुन्हा खुला झाला आहे. अन्यथा, त्यांना अनेक वर्षे प्रतीक्षा करावी लागली असती. आता विभागीय परीक्षा त्यांच्या करिअरमध्ये प्रगतीसाठी नवे दार उघडेल. गृह राज्यमंत्री योगेश कदम म्हणाले, पोलिस दलातील मेहनती, कर्तव्यनिष्ठ आणि तरुण पोलिस अंमलदारांना अधिकारी म्हणून पुढे जाण्याची संधी मिळावी यासाठी हा निर्णय महत्त्वाचा आहे. या शासन निर्णयामुळे पोलिस दलात नवे चैतन्य निर्माण होईल.

◆ पान ९ वरून पुढे...

## शुल्लक कारणावरून...

सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी हनपुडे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किशोर पवार, स्थागुशा बीडचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, सहायक पोलीस निरीक्षक विलास मोरे, संदिप दुनगहु, गजानन क्षिरसागर, ग्रेड पो.उपनि. वासुदेव मिसाळ, पोहवा रवी आघाव, भास्कर केंद्रे, पोना संतोष राऊत, ज्ञानेश्वर मराडे, मपोह अनिता खरमाटे, पोहवा माने, पोशि बाळु रहाडे, दिलीप राठोड, अशोक राडकर, विलास कांदे, राजेभाऊ जाधव, लादे, नवनाथ डाके, लिंबाजी महानोर, अमोल लोंढे, तसेच स्थागुशा बीडचे पोहवा राहुल शिंदे, दिपक खांडेकर यांच्या पथकाने केली.

## मुंबईहुन परतलेल्या...

लिंबागणेश पंचक्रोशीतील लिंबागणेश, मुळुकवाडी, सोमनाथवाडी, पोखरी (घाट), बेलगाव, मसेवाडी, पिंपरनई, अंजनवती, मेंगडेवाडी व महाजनवाडी येथील मराठा सेवकांनी मुंबईतील आंदोलनाला हजेरी लावली होती. आझाद मैदान परिसरातील हॉटेल, दुकाने बंद झाल्यामुळे आलेली गैरसोय लक्षात घेऊन या गावांतून मोठ्या प्रमाणावर खाण्याचे साहित्य व पिण्याच्या पाण्याची रसद मुंबईत पोहोचवण्यात आली होती. आंदोलकांची पहिल्या दिवशी उपासमार झाल्याने ग्रामस्थांमध्ये सरकार विरोधात तिव्र रोष होता.महिलांच्या भावना अनावर झाल्या होत्या त्यातुन त्यांनी तिव्र नाराजी व्यक्त केली होती. सोमवारी लिंबागणेश येथे रास्ता रोको आंदोलनही करण्यात आले होते. अखेरच्या विजयामुळे आता मराठा समाजाला शैक्षणिक व नोकरीच्या संधींचा लाभ मिळेल, असा विश्वास

◆ पान ९ वरून पुढे...

मराठा सेवक डॉ. गणेश ढवळे यांनी व्यक्त केला. जरांगे पाटील यांनी उपोषण मागे घेतल्याने सर्वत्र समाधानाचे वातावरण असून फटाके फोडून उत्सवाचा आनंद व्यक्त होत आहे.

## हजरत महंमद...

समाजसेवक, मा.न.प. सदस्य अश्फाक ईनामदार, शेख युनूस माजी नगरसेवक, फेरोज पठाण, इम्रान खान, युवा नेते बरकत पठाण, सय्यद खालेक, सय्यद इफ्तेखार (हिना ट्रॅव्हल) अलीम पटेल (कामगार जिल्हाध्यक्ष) यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य महा क्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले असून रक्तदात्यांनी या शिबीरास उपस्थित राहण्याचे आवाहन माजी सभापती शकील खान यांनी केले आहे.

## आरक्षणाच्या संरक्षणासाठी...

प्रदेश सरचिटणीस ॲड. सुभाष राऊत यांच्या नेतृत्वाखाली आपल्या मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी बीड यांना सादर केले आहे. याबाबत जिल्हाधिकारी बीड यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, भारतीय राज्यघटनेने सामाजिक, आर्थिक दृष्ट्या पिडीत, वंचीत घटकांना आरक्षणाची तरतुद केली. ही करत असतांना घटनात्मकदृष्ट्या नेमलेल्या आयोगांच्या सर्वेक्षण आणि घटनात्मक तरतुदीनुसार समाजाच्या मुख्य प्रवाहापासून कोसो दूर असलेल्या घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी मंडल आयोगाच्या तरतुदीनूसार इतर मागासवर्गीय घटकातील १२ बलुतेदार १८ अलुतेदार, दुर्बल, वंचीत, पिडीत व मागास घटकातील हजारो जातींना ओबीसी या प्रवर्गात समाविष्ट करण्यात आले. वर्षानुवर्ष प्रस्थापितांची गुलामी करत. या प्रवर्गातील अनेक जातीतील समुदाय जगलेला आहे. मंडल आयोगाच्या

◆ पान ९ वरून पुढे...

अंमलबजावणीनंतर या प्रवर्गाला शिक्षण, प्रशासन आणि राजकारण यात लोकसंख्येच्या निम्या प्रमाणात म्हणजे २७% आरक्षण प्राप्त झाले. हजारो वर्षापासून प्रस्थापितांची चाकरी करण्यात गेलेल्या या समाजाला काही अंशी प्रतिनिधीत्व मिळत असतांनाच मनोज जरांगे यांच्या माध्यमातून बेकायदेशीररित्या बळाचा वापर करून घटनाबाहय आंदोलनाच्या माध्यमातून शासनावर दबावतंत्र वापरून ओबीसी आरक्षण संपवण्याचा एक कलमी कार्यक्रम महाराष्ट्रात सध्या चालू आहे. आर्थिक, सामाजिक, राजकीय दृष्ट्या प्रबळ असलेल्या मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गात समावेश करण्यासाठी शिंदे समितीच्या माध्यमातून ५९ लाख बोगस कुणबी नोंदीची घुसखोरी झाल्याने ओबीसी समाजात चिंतेचे, भितीचे व दहशतीचे वातावरण झाले आहे. गत काळात महाराष्ट्र बेकायदेशीर आंदोलनाने होरपळलेला आहे. यामुळे शासनाने दबावतंत्राला बळी पडून ५९ लाख नोंदीद्वारे मराठा समाजाला ओबीसीमध्ये आणून मोठ्या प्रमाणात ओबीसीवर अन्याय केला आहे. आता सध्या मुंबईमध्ये मनोज जरांगे यांच्या बेकायदेशीर आणि बळाचा वापर करून होत असलेल्या आंदोलनापुढे झुकून परत न्या. शिंदे समितीला मुदतवाढ देवून एक प्रकारे मुळ ओबीसी प्रवर्गातील दुर्बल घटकांना अस्तित्व नष्ट करण्याच्या प्रवृत्तीला शासन एक प्रकारे सहाय्य करत आहे. त्यामुळे सरकारने दबावाखाली न घेता घटनात्मक बाबीचा विचार करून ओबीसीमध्ये मराठा समाजाची होत असलेली घुसखोरी थांबवावी. अन्यथा ओबीसी प्रवर्गात अत्यंत अस्वस्थता आहे. जर आपण ओबीसीवर अन्याय केला तर ओबीसी प्रवर्ग सुद्धा रस्त्यावर उतरल्या शिवाय राहणार नाही याची नोंद घेवून ओबीसीच्या भावना समजून ओबीसी प्रवर्गात मराठा समाजाचा शिरकाव होण्यापासून रोखा, अन्यथा यामुळे अस्वस्थ ओबीसी समाज तीव्र आंदोलनाचा मार्ग अवलंबेल व त्यानंतर होणाऱ्या परिणामाची

◆ पान ९ वरून पुढे...

जबाबदारी शासनाधी असेल याची नोंद घ्यावी. याप्रसंगी परीट समाजाचे प्रदेशाध्यक्ष गणेश जगताप, बंजारा समाजाचे नेते प्रा. पी. टी. चव्हाण, वंजारी कर्मचारी महासंघाचे बीड जिल्हाध्यक्ष मोहन आघाव, ऑल इंडिया मुस्लिम ऑर्गनायझेशनचे बीड जिल्हाध्यक्ष प्रा. रफिक बागवान, माळी महासंघाचे नेते प्रा. लक्ष्मण गुंजाळ, सोनार समाजाचे ड. संदीप बेदरे, सेवालाल सेनेचे संस्थापक अध्यक्ष बी. एम. पवार, वंजारी समाजाचे नेते माऊली शिरसट, केशव तांदळे, धनगर समाजाच्या नेत्या श्रीमती मीनाक्षीताई देवकते, श्रीमती मयुरी बांगर, श्रीमती संजीवनी राऊत, सुतार समाजाच्या किस्किंदाताई पांचाळ, समता परिषदेचे बीड शहराध्यक्ष निखिल शिंदे, युवा नेते नितीन राऊत, राजू महूवाले, शुभम राऊत, सावता काळे, दत्तात्रय गोंदणे, अजय राऊत, संतोष रासवे, माळी महासंघाचे धनंजय काळे, कान्हा मेत्रे, मंगेश जमदाडे, गणेश काळे, उत्तरेश्वर शेलार, अनिकेत जिरे, महेश राऊत, राहुल राऊत, कृष्णा राऊत, पिंकू कदम, अंकुश कदम, नवनाथ कदम, निखिल ढोरमारे, हर्षद राऊत, भागवत राऊत, शंकर राऊत, प्रकाश राऊत, उमेश साळुंखे, कुमार शिंदे, राणा गोरे, प्रदीप उगलमुगले, विलास राठोड, धनंजय रोकडे, हनुमान ढाकणे, दत्ता वाघ, अजय ढाकणे, केशव तांदळे, कानिफनाथ विघ्ने, दिनेश शेप, गोपाळ शिंगारे, जगन्नाथ खेत्री, ऋषिकेश रासवे, चक्रधर हिवरकर, शशी पुरी, दीपक राख, अशोक जाधव, सुमंत राऊत, संभाजी राऊत, नारायण साळुंखे, जालिंदर राऊत, नवनाथ कदम, प्रकाश राऊत, श्रीमती चंद्रकला बांगर, श्रीमती सुमन कटोर, श्रीमती उषा चव्हाण, श्रीमती जया राऊत, श्रीमती सुरेखा बिडवे, श्रीमती संगीता डोंबरे, श्रीमती रेखा शिंदे, श्रीमती साधना शिंदे, श्रीमती मनीषा ठोंबरे यांच्यासह ओबीसी समाजाचे प्रतिनिधित्व करणारे शेकडो ओबीसी बांधव, भगिनी, युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● गुरूवार, दि. ०४ सप्टेंबर २०२५ ● पान ४



बीड : सौ.विद्याताई अशोक चौरे यांच्या निवासस्थानी गौरी-लक्ष्मीची अत्यंत सुंदर सजावट करून पारंपरिक पद्धतीने प्रतिष्ठापना करण्यात आली. फुलांच्या आरास, दिव्यांच्या रोषणाईने आणि पारंपरिक थाटामाटात गौरी-लक्ष्मीचे स्वागत करण्यात आले.

# शुल्लक कारणावरून युवकाची हत्या करणारा आरोपी १२ तासांत अटकेत

### ● बीड पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी

**बीड । प्रतिनिधी**

शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीत झालेल्या खून प्रकरणात बीड पोलिसांनी केवळ १२ तासांत आरोपीला जेरबंद करत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. दिनांक ०२ सप्टेंबर २०२५ रोजी रात्री ११.३० वाजता महाराणा प्रताप चौक, बीड येथे किरकोळ वादातून अभिषेक राम गायकवाड याने धारदार चाकूने विजय सुनिल काळे याच्या छातीत वार करून त्याला ठार मारले व घटनास्थळावरून पसार झाला होता. या प्रकरणी फिर्यादी सुनिल मारोती काळे (वय ४७, व्यवसाय - शिव जेन्ट्स पार्लर चालक, रा. बाराभाई गल्ली धारूर, ह.मु. स्वराज्यनगर, बार्शी रोड, बीड) यांच्या तक्रारीवरून शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गु.र.नं. ४५२/२०२५, कलम १०३ बी.एन.एस. प्रमाणे गुन्हा दाखल झाला.



गुन्हा गंभीर स्वरूपाचा असल्याने वरिष्ठांच्या आदेशानुसार शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या चार पथकांसह स्थागुशा बीडच्या दोन पथकांना आरोपीच्या शोधासाठी रवाना करण्यात आले. रात्रभर शोध घेत असताना आरोपी अभिषेक राम गायकवाड हा पाटोदा तालुक्यातील काकडहिरा शिवारातील डोंगर परिसरात लपल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी तात्काळ त्या ठिकाणी धाव घेत डोंगर-दऱ्यांमधून पाठलाग करून आरोपीला शिताफीने पकडले आणि अटक केली. ही कारवाई मा. पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक

► उर्वरित पान २ वर

## थोडक्यात...

### आण्णाभाऊंचे साहित्य क्रांतीचा आवाज; छोटेवाडी येथे डॉ. मिलिंद आव्हाड यांचे प्रतिपादन



**बीड । प्रतिनिधी**

समाजातील वंचित, शोषित, पीडित घटकांना आपल्या साहित्यातून आवाज देणारे आणि त्यांच्या वेदना व वास्तव समाजापुढे मांडणारे आण्णाभाऊ साठे यांची साहित्य परंपरा आजही तितकीच जिवंत असल्याचे मत मानवी हक्क अभियानचे अध्यक्ष डॉ.मिलिंद आव्हाड यांनी व्यक्त केले. माजलगाव तालुक्यातील छोटेवाडी येथे साहित्यसम्राट आण्णाभाऊ साठे गौरव महोत्सव नुकताच मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते मानवी हक्क अभियानचे अध्यक्ष डॉ. मिलिंद आव्हाड बोलत होते.या महोत्सवाला विचारमंचावर समता परिषदेचे माजलगाव तालुका अध्यक्ष जगन खेत्री, पत्रकार सुनिल डोंगरे, बंडू लोखंडे, अशोक थोरात, माजी सरपंच प्रल्हाद दळवी, लहू मस्के, दत्तात्रय इंगळे, संदिप सोळंके, भागवत इंगळे, आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनीही आपल्या मनोगतातून अण्णाभाऊंच्या साहित्य व विचारांचा प्रभावी वारसा मांडला. पुढे बोलताना मिलिंद आव्हाड यांनी आपल्या भाषणात अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याचा व साहित्याचा वेध घेत समाज परिवर्तनासाठी त्यांच्या विचारांची गरज अधोरेखित केली. त्यांचे साहित्य केवळ मनोरंजन नसून ते क्रांतीची दिशा दाखवते. आजही समाजात अन्याय, विषमता आणि उपेक्षा कायम असताना अण्णाभाऊंच्या साहित्याचा अभ्यास प्रत्येक तरुणाने करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले..या कार्यक्रमास छोटेवाडी तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. युवक, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांनी सहभाग घेत उत्स्फूर्त वातावरण निर्माण केले. गौरव महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी महापुरुष युवामंच, जयंती समितीचे विशेष योगदान लाभले. समाजातील समतेचा आणि समानतेचा संदेश या कार्यक्रमातून अधोरेखित झाला.

### शांतता समितीच्या बैठकीत मंडळाने केलेल्या सूचनेचा पाटोदा प्रशासनाला विसर गणेश विसर्जन मिरवणुक जवळ आली तरी खड्डे मात्र बुजवण्यात आले नाही

**पाटोदा । प्रतिनिधी**

गणेश उत्सवा निमित्त आयोजित करण्यात आलेल्या पाटोदा पोलीस स्टेशनच्या शांतता समितीच्या बैठकीत प्रशासनाला मंडळांनी विविध सूचना केल्या व प्रशासनाने ही नागरिकांना शिस्त व नियम पाळण्याचे आवाहन केले होते. मात्र विसर्जन मिरवणूक अगदी जवळ आली असतानाही पाटोदा शहरातील मांजरा नदी पुलावरील मोठे खड्डे बुजवण्यात आली नाही याकडे सर्वाच लक्ष वेधले जात आहे. मांजरा नदी पुलावरून हजारो गणेशभक्त विसर्जन मिरवणुकीतून जाणार असून, या खड्ड्यांमुळे अपघाताचा धोका वाढला आहे. नागरिकांनी अनेक वेळा ही बाब प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिली तरी अद्याप कोणतीही दखल घेतली गेलेली नाही.सुरक्षा व वाहतुकीच्या दृष्टीने हा विषय अत्यंत गंभीर असून, विसर्जन मिरवणुकीच्या आदल्या दिवशी तरी संबंधित विभागाने तातडीने खड्डे बुजवून दुरुस्ती करावी, अशी मागणी सर्वत्र होत आहे. अन्यथा कुठल्याही अपघाताची जबाबदारी प्रशासनावर राहील असा इशारा गणेश भक्तांनी दिला आहे.

### बाबुलालजी ललवाणी यांचे निधन

**बीड । प्रतिनिधी**

येथील जैन समाजातील ज्येष्ठ श्रावक असणारे बाबुलालजी हरकचंदजी ललवाणी यांचे (मंगळवार) रात्री ९ वाजण्याच्या सुमारास वृद्धापकाळाने जैन धर्मात अत्यंत महत्वपूर्ण असणार्या सागरी संथारा व्रतात निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८७ वर्षे होते. मुळ शिरूर का. येथील रहिवासी असणारे परंतू मागिल अनेक दशकांपासून बीड शहरात ते वास्तव्यास होते. मागिल सहा दशकांहून अधिक काळापासून ते किराणा व्यवसायात होते. अत्यंत मनमिळावू स्वभाव व धार्मिक वृत्ती असल्याने समाजासह बीड शहरातही त्यांचा परिचय होता. अनेक वर्षांपासून ते समाजात मार्गदर्शक म्हणून ओळखले जात. मागिल काही दिवसांपासून आजारी असल्याने त्यांच्यावर उपचार सुरू होते. अखेर आज सायंकाळी ९ वाजण्याच्या सुमारास सागरी संथारा व्रतात त्यांचे निधन झाले. विनोद, राजेन्द्र ललवाणी यांचे ते वडील होत.

## मुंबईहुन परतलेल्या आंदोलकांचा लिंबागणेशमध्ये जल्लोष

### आतषबाजी, गुलालांची उधळण ; जरांगे पाटलांच्या आंदोलनाला यश : डॉ.गणेश ढवळे

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

मुंबईतील आझाद मैदानावर मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी लढा देणारे संघर्ष योद्धा मनोजदादा जरांगे पाटील अखेर विजयी झाले. सरकारने मागण्या मान्य केल्यानंतर मराठा समाजात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, उपाशीपोटी आंदोलनात सहभागी झालेल्या मराठा सेवकांनी विजयाचा गुलाल उधळत गावी परतण्याचा आनंद व्यक्त केला. बुधवारी मुंबईहून परतलेल्या आंदोलकांच्या स्वागतासाठी लिंबागणेशच्या मुख्य चौकात गावकऱ्यांनी आतषबाजी,



गुलालांची उधळण करत जल्लोष साजरा केला. जरांगे पाटलांचे फलक डोक्यावर घेऊन, गाणी वाजवत, नाचगाणी करत ग्रामस्थांनी आनंदोत्सव केला.

► उर्वरित पान २ वर

## विकास पवार रसायनशास्त्र विषयात सेट परीक्षा उत्तीर्ण

**बीड । प्रतिनिधी**

येथील नवगण शिक्षण संस्थेचे सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील रसायनशास्त्र विषयाचा माजी विद्यार्थी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठा मार्फत घेतल्या जाणार्या, सहाय्यक प्राध्यापक पदासाठी आवश्यक असणार्या महाराष्ट्र राज्य पात्रता परीक्षा जून २०२५, या परीक्षेत रसायनशास्त्र विषयात यश संपादन केले.

रसायनशास्त्र विषयाचा सौ. के.एस.के.महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी असून त्याच्या या यशाबद्दल नवगण शिक्षण संस्थेच्या सहसचिव डॉ.दीपा क्षीरसागर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या यशाबद्दल अध्यक्ष श्री.किशोर काळे, उपाध्यक्ष डॉ.भारतभूषण क्षीरसागर,संस्थेचे सचिव डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर,सहसचिव डॉ.दीपा क्षीरसागर, पूजा भारतभूषण क्षीरसागर, डॉ.सारिका क्षीरसागर प्रशासकीय अधिकारी डॉ.सुधाकर गुट्टे, डॉ.विश्वांभर देशमाने तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर, पदव्युत्तर पदवी विभागाचे संचालक डॉ.खान ए.एस., कमवि उपप्राचार्य डॉ.नारायण काकडे, यांनी त्यांचे अभिनंदन केले

## केज पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी पदाचा नागरगोजे साहेब यांनी स्वीकारला पदभार

### आर.पी.आय.(आंबेडकर) पक्षाच्या पदाधिकारी यांच्या वतीने केला सत्कार

**केज । प्रतिनिधी**

केज येथील पंचायत समिती कार्यालयातील गटविकास अधिकारी (BDO) या पदाचा कार्यभार विठ्ठल नागरगोजे साहेब यांनी नुकताच स्वीकारला आहे. विठ्ठल नागरगोजे साहेब यांनी पंचायत समिती केज (BDO) या पदाचा कार्यभार नुकताच

► उर्वरित पान २ वर





अखिल भारतीय मराठा महासंघाचे मराठवाडा विभागीय सरचिटणीस विनोद आप्पा इंगोले यांच्या निवास्थानी इंगोले परिवार श्रीची आरती करताना.



वरवटी/आहेर धानोरा बीड ग्रुप ग्रामपंचायत मधून मराठा आरक्षण मिळाल्या बद्दल संघर्ष योद्धा मा.श्री.मनोज दादा जरांगे पाटील यांचा धन्यवाद मनून युवा नेते बालासाहेब आबा इंगोले मित्रमंडळानी मोठ्या जल्लोषात साजरी केला.

## हजरत महंमद पैगंबर जयंती निमित्त रक्तदान शिबीराचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

हजरत महंमद पैगंबर जयंती निमित्त मा.न.प. सभापती शकील खान यांच्या आयोजना खाली भव्य रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

हजरत महंमद पैगंबर जयंती निमित्त शकील खान यांच्या आयोजनात दि. ५ सप्टेंबर रोज शुक्रवार सकाळी १० ते सांय ५ वाजे पर्यंत बशिरगंज येथिल मोईन मास्टर यांचे संपर्क कार्यालया समोर महा रक्तदान शिबीर आयोजीत असून या शिबीरात बीडचे पोलिस अधिक्षक नवनीत कावत साहेब, डी. वाय. एस.पी. पराडकर साहेब यांच्या उपस्थितीत माजी उपाध्यक्ष नगर परिषद बीडमोईन मास्टर, संपादक शेख तय्यब, माजी न. प. उपाध्यक्ष फारूक पटेल, म ेहबतखान, शेख इलियास अहेमद (बिल्डर) ► उर्वरित पान २ वर

# आरक्षणाच्या संरक्षणासाठी ओबीसी आक्रमक !

### ● ओबीसी प्रवर्गात मराठा समाजाची बेकायदेशीररित्या होत असलेली घुसखोरी थांबवा!
### ● सकळ ओबीसी समाजाच्या वतीने जिल्हाधिकारी बीड यांना निवेदन सादर

**माजलगाव । प्रतिनिधी**

शासनाने एस.ई.बी. सी.च्या माध्यमातून मराठा समाजाला अगोदरच १०% आरक्षण दिलेले आहे. त्यामुळे ओबीसीमध्ये नव्याने धावलेल्या ५३ लाख नोंदी तात्काळ रद्द कराव्यात. न्या. शिंदे समिती पक्षपातीपणे काम करत आहे. त्यामुळे ही समिती बरखास्त करण्यात यावी. दि. ०२.०९.२०२६ रोजी काढलेला शासन निर्णय क्र. सीवीसी - २०२५ / प्र.क्र. १२९ हा तात्काळ रद्द करण्यात यावा या प्रमुख मागण्यांसाठी बीड जिल्ह्यातील ओबीसी समाज बांधव आक्रमक झाला असून बुधवार दि. ३ सप्टेंबर २०२५ रोजी मोठ्या संख्येने एकत्रित येत ओबीसी प्रवर्गात मराठा समाजाची बेकायदेशीररित्या होत असलेली घुसखोरी थांबविण्यात यावी याकरिता ओबीसी समाज बांधवांनी समता परिषदेचे ► उर्वरित पान २ वर



### ● हैद्राबाद गॅझेटियर शासन परिपत्रकाची होळी!

यावेळी उपस्थित ओबीसी बंधू-भगिनीने गगनभेदी घोषणा देत जिल्हाधिकारी कार्यालय दुमदुमून सोडले होते. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयासमोर हैद्राबाद गॅझेटियर शासन परिपत्रकाची होळी ओबीसी बांधवांनी केली. शासनाने ओबीसी समाजाच्या भावना समजून घेऊन तात्काळ सदरील शासन परिपत्रक रद्द करावे अन्यथा यापुढे ओबीसीचे राष्ट्रीय नेते ना. छगनराव भुजबळ साहेब यांच्या नेतृत्वाखाली तीव्र आंदोलन करण्यात येऊन वेळ पडल्यास मुंबई देखील जाम करण्यात येईल असा इशारा समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ड. सुभाष राऊत यांनी यावेळी दिला.